# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/12/2022 (शुक्रवार) दुपार

---

## जबरी संभोग

**पो.स्टे. बुट्टीबोरी :–** माहे सप्टेंबर २०२२ ते ०६ आक्टोंबर २०२२ दरम्यान वय १७ वर्षीय फिर्यादी/पीडिता अल्पवयीन मुलगी ही नमुद घटनावेळी व ठिकाणी घरी एकटी हजर असतांना यातील आरोपी नामे– प्रकाश सरदार, वय ३५ वर्ष, रा. चामोर्शी जि. गडचिरोली ह. मु. गोसावी नगर बुटटीबोरी जि. नागपूर याने फिर्यादी/पिडीता हिला लग्नाचे आमिश दाखवून तिचे सोबत जबरदस्तीने वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापित केले. पिडीतेला मासीक पाळी न आल्याने व तिचे अंगाला खाज सुटल्याने तिच्या आईने तिला डॉ. देशपांडे कडे दाखवण्यासाठी नेले असता त्यांनी तिला सोनोग्राफी करण्यास सांगितल्याने तिने डॉ. मनिश हांडे कडे सोनोग्राफी केली असता तिला कळले की ती चार महिन्याची गर्भवती आहे. तिने तिचे घरचे लोक रागावतील म्हणून त्यांना घटनेची माहिती सांगितली नाही. पिडीतेचे वडील व भाऊ हे बाहेरगावी कामाला गेले असल्याने ते परत आले तेव्हा तिने त्यांना घटनेची संपूर्ण माहिती देवून पिडीतेच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशनला सदर गुन्हा नोंद करून तपासावर घेण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(३) ३७६ (२)(एन) भादवी. सहकलम ४ बाल लैगिंक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आरती उघडे मो. क्रं. ८३५५९४७४७३ या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. देवलापार :–** अंतर्गत मौजा मानेगाव टेक शिवार एन. एच. ४४ हायवे रोड येथे दिनांक २२/१२/२०२२ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– घनसू फुसू मरकाम, वय ७० वर्ष, रा. कोठार ता. कुरई मध्यप्रदेश हा मानेगाव टेक शिवारातील एन. एच. ४४ हायवे रोडनी नागपूर कडून जबलपूर कडे रोडचे कडेने पायदळ जात असतांना आरोपी कंटेनर क्र. टी. एस.–०८ यु. एफ.–९८३६ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून मृतकास धडक दिल्याने कंटेनरचे डाव्या साईडचे मागील चाक मृतकाचे अंगावरून गेल्याने मृतकाचे कमरेपासून दोन्ही पाय तळपायापर्यतचा भाग चेंदामेंदा झाला व डाव्या हाताला गंभीर जखम होवून मृतक जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नाईक संदीप नागोसे ब नं. १९७४ पोस्टे देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. देवलापार येथे आरोपी कंटेनर चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मो.वा.का. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील सहायक पोलीस निरीक्षक श्री प्रविण बोरकुटे मो. क्र. ९५४५६६७२२३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**